ना.डॉ.नीलम दिवाकर गोऱ्हे

उप सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र राज्य.

# पानशेत येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कारातील आरोपीला फाशीची शिक्षा !डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केले पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांचे अभिनंदन...

पुणे दि.०१ : जिल्ह्यातील पानशेत परिसरात अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. सदरील घटनेचा पाठपुरावा विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे ह्या करत होत्या. अनुषंगाने पत्र देऊन आरोपाला लवकरात लवकर आणि जास्तीत जास्त शिक्षा होण्याची सूचना केली होती. याबाबत पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांच्याशी वारंवार संपर्क करून या केसची माहिती देखील डॉ.गोऱ्हे या घेत असत.

या घटनेतील आरोपीनं पीडित मुलीला पैसे आणि खाऊ देण्याचं आमिष दाखवून तिला पळवून नेलं होतं. यानंतर नराधमाने चिमुकलीवर अमानुष अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली होती. संपूर्ण जिल्ह्याला हादरवणारी ही घटना उघडकीस येताच पोलिसांनी अवघ्या ४८ तासात आरोपीना अटक करण्यात आले होते.

हा खटला न्यायालयात गेल्यानंतर काल २८ फेब्रुवारी २०२२ रोजी न्यायालयाने आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. पोलिसांनी केलेली कारवाई , योग्य तपास व सादर केलेले साक्षी पुरावे न्यायालयात सिद्ध झाल्याबद्दल डॉ.गोऱ्हे यांनी समाधान व्यक्त केला आहे. तसेच मा. न्यायाधिशांचे आभार मानले आहेत. पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांचे व या घटनेत आरोपीला अटक करून फाशीच्या शिक्षा होण्यासाठी आणि मुलीला न्याय देण्यासाठी काम करणारी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी, सरकारी अभियोक्ता श्री विलास पठारे, तपास अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री मनोज पवार यांचे डॉ.गोऱ्हे यांनी अभिनंदन व आभार मानले आहेत.

मुंबई कार्यालय संपर्क : उपसभापती कार्यालय, पहिला मजला, विधानभवन, नरीमन पॉईंट, मुंबई. ४०००२१
(सायं ४ ते ६ : मंगळवार, बुधवार, गुरुवार)
पुणे कार्यालय पत्ता :- सिल्व्हर रॉक्स, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे. ४११०१६
ईमेल : neelamgorhe@gmail.com, dychairman.mls@gmail.com, पीए मो.नं.: ९०२८३३३३०५